प्रेसनोट दि.१९/१२/२०१७

## दिल्ली, हरियाना येथुन विदेशात नोकरी, इन्शुरन्स पॉलिसीवर कर्ज आणि मॅट्रीमोनियल साईटवर मैत्री करून गिफ्ट देण्याचे आमिषाने फसवणुक करणाऱ्यांना सायबर क्राईम सेल कडुन अटक.

### जॉब फ्रॉड -

नऱ्हे अंबेगाव पुणे भागात राहणाऱ्या उच्चशिक्षीत बेरोजगार तरुणास आरोपींने फेसबुकवरुन भैरब मंडल नावाच्या जॉब कंन्सल्टंट नावाने संपर्क केला त्यास कन्सल्टन्सीचा क्रमांक म्हणुन मो.नं.८५८८०४२४६४ नंबर देवुन त्यावर सदर तरुणाने संपर्क केला असता परदेशात नोकरीचे बहाण्याने आयर्लंड देशात हॉटेल मॅनेजर नोकरी मिळवुन देण्याची खात्री देऊन त्याचेकडून कन्सल्टन्सी फी , विमान तिकीटाचे पैसे, व्हिसा फी यासाठी वेळोवेळी पैशाची मागणी करुन त्यास बनावट ईमेल, सर्टिफिकेट व व्हिसा ईमेलवर पाठवुन एकुण ८,५०,०००/- रुपये वेगवेगळया बँक अकाऊंटवर भरण्यास भाग पाडुन फसवणुक केली म्हणुन सदर तरुणाने सायबर क्राईम सेल येथे तक्रारी अर्ज दिला. सदर अर्जावरुन सिंहगड रोड पोलीस स्टेशन गु.र.नं. ३८२/२०१७ भा.दं.वि.क. ४१९,४२० व माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६(डी) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

नमुद गुन्हयाचा संमांतर तपास पोनि पायगुडे, सायबर क्राईम सेल, गुन्हे शाखा पुणे शहर यांच्या मार्फतीने करण्यात आला. तांत्रिक विश्लेषणावरुन नमुद गुन्हयातील आरोपी हरियाना या भागात वास्तव्यास असल्याची माहिती मिळाली. सायबर क्राईम सेलकडील तपास पथकाने सिंहगड रोड पो.स्टे. पुणे शहर गु.र.नं. ३८२/२०१७ भा.दं.वि.क. ४१९,४२० व माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६(डी) या गुन्हयातील आरोपीचा पालम विहार, गुडगाव, हरीयाणा येथुन आरोपी नामे – नितीन संतसिंग रतन यास अटक करुन त्याचेकडुन त्याच्याकडुन फिर्यादी यांचा पासपोर्ट, आंध्रा बँक अकाऊंट नं. १११३११००११००३९३१ चे पासबुक व एटीएमकार्ड तसेच त्याचेकडून गुन्हयात वापरलेले- १ मोबाईल, १ डोंगल व १ हार्डडीस्क जप्त करण्यात आली आहे. त्यास पुढील कार्यवाहीकामी सिंहगड पोलीस स्टेशन यांचे ताब्यात दिले आहे. सदर आरोपीने वापरलेले १ अकाऊंट फ्रिज करण्यात आले असुन त्याने भारतभर १०-१२ लोकांची एकुण ३५ ते ३७ लाखांची फसवणुक केल्याचे सकृत दर्शनी दिसुन येत असुन अधिक तपास सुरु आहे.

### इन्शुरन्स ॲन्ड लोन फ्रॉड -

निगडी येथील तरुणास रिलायन्स कॅपिटल पॉलीसी येथुन बोलत असल्याचे फोनवरुन सांगुन कर्ज पाहीजे असल्यास प्रथम एक्साईड लाईफ इन्सुरन्स कंपनीमध्ये पॉलिसी साठी ३०,०००/- रुपये भरण्यास सांगुन सदर पॉलिसी रिलायन्स कॅपिटल पॉलीसी कंपनीकडे मॉरगेज ठेवुन त्यावर ५ लाखाचे कर्ज मंजुर करुन देतो असे सांगुन कर्ज मंजूरीसाठी वेगवेगळी कारणे सांगुन एकुण १,८५,०००/- रुपये बँक अकाऊंट व पेटीएम वॉलेटमध्ये भरण्यास सांगुन फसवणुक केली म्हणुन सदर तरुणाने सायबर क्राईम सेल येथे तक्रार अर्ज दिला होता. सदर अर्जावरुन निगडी पो.स्टे. पुणे शहर गुन्हा रजि. नं. ६८५/२०१७ भा.दं.वि.क. ४१९,४२० व माहिती तंत्रज्ञान कायदा कलम- ६६सी, ६६डी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

निगडी पो.स्टे पुणे शहर गुन्हा रजि. नं. ६८५/२०१७ भा.दं.वि.क. ४१९,४२० व माहिती तंत्रज्ञान कायदा कलम- ६६सी, ६६डी या गुन्हयातील प्राप्त माहितीचे पोउपनि खामगळ यांनी केलेले तांत्रिक विश्लेषणा आधारे सायबर सेल तपास पथकाने आरोपींचा सानिया विहार दिल्ली या भागात शोध घेवुन गुन्हयातील आरोपी १) रोशन नारायण झा वय २० वर्षे रा. ई/३, ५१४, चौथा पुस्ता, सोनिया विहार नवी दिल्ली, यास अटक केली व त्यानंतर त्याचे मदतीने त्याचा साथीदार नामे २) यशपालसिंग सन ऑफ बलविंदरसिंग वय २८ वर्षे रा. ६९८, सेक्टर-४, कर्नल हरियाना- १३२००११ सध्या- एस/२,विजयनगर दिल्ली, यास दिल्ली येथुन अटक करुन त्याचेकडुन गुन्हयातील २ मोबाईल २ सिमकार्ड, ४ एटीएम/डेबिट कार्ड जप्त करण्यात आले आहे. त्यांना पुढील कार्यवाहीकामी निगडी पो.स्टे येथे ताब्यात देण्यात आले आहे. सदर आरोपीने गुन्ह्यात ९७१६८१२०१३ व ९९११४९८८८२८ या पेटीएम वॉलेटचा वापर केला असुन त्याने आणखी १८-२० लोकांची एकुण १६ ते १८ लाखांची फसवणुक केल्याचे सकृत दर्शनी दिसुन येत असुन अधिक तपास सुरु आहे.

### जॉब फ्रॉड -

चंदननगर, पुणे भागातील तरुणास नोकरीसाठी डेली शाईन करियर मधुन बोलत असल्याचे सांगुन त्यांना नोकरीसाठी रजिस्ट्रेशनसाठी प्रथम २६५०/- रुपये व त्यानंतर प्रोफाईल व्हेरिफिकेशन व इतर कारणासांठी असे ८७००/- रुपये पेटीएम द्वारे भरण्यास भाग पाडुन एकुण ११,४००/- रुपयांची आर्थिक फसवणुक केली आहे म्हणुन सदर तरुणाने सायबर सेल येथे तक्रार अर्ज दिला सदर अर्जावरुन चंदननगर पो.स्टे. पुणे शहर गु.र.नं. ३२३/२०१७ भा.दं.वि.क. ४१९,४२० व माहिती तंत्रज्ञान कायदा कलम- ६६सी, ६६डी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सायबर सेल पथकाने सपोनि शिंदे यांनी केलेल्या तांत्रिक विश्लेषणाचे आधारे चंदननगर पो.स्टे. पुणे शहर गु.र.नं. ३२३/२०१७ भा.दं.वि.क. ४१९,४२० व माहिती तंत्रज्ञान कायदा कलम- ६६सी, ६६डी या गुन्हयातील आरोपी यांचा गाझियाबाद, उत्तर प्रदेश येथे शोध घेवुन आरोपी आशिषकुमार सिंग वय २६ वर्षे रा. मातौर पोस्ट डौराला,ता.सरदना, जि. मिरट,उत्तर प्रदेश यांस अटक केली त्याचेकडुन १३ मोबाईल हॅण्डसेट, ६५ सिमकार्ड, १ लॅपटॉप, ५ एटीएम कार्ड, १ आधार कार्ड, १ पॅनकार्ड, दोन बॅंक पासबुक, १ वायफाय हॉटस्पॉट असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर आरोपीस गुन्हयाचे पुढील कार्यवाहीकामी चंदननगर पो.स्टे. पुणे यांचे ताब्यात दिले आहे.

सदर आरोपीने ७८३८४६२६१४, ८८६०३९५९५९, ८८८२९२५११६, ९२१०१७६३४०, ९२१०५८५२०६, ९२१०५८७५३१, ९२१०६४२५३३, ९२१०६४२५३९, ९२१११४५१७९,९२१११५६७४७, ९२१११८०८१९, ९२१३८०१९२३, ९५५७७२९९७० या पेटीएम वॉलेटचा फसवणुकीसाठी वापर करुन अंदाजे १३२ ते १३५ लोकांची एकुण ७ ते ८ लाखाची फसवणुक केल्याचे संशय असुन तपास सुरु आहे.

## गिफ्ट ॲन्ड मॅट्रीमोनियल फ्रॉड -

फिर्यादी रा. थेरगाव वय-६५ वर्ष यांनी दुसऱ्या लग्ना करीता jeevansathi.com या वेबसाईटवर नाव नोंदणी केली होती. त्यावरुन फ्रान्सीस मर्सी या महिला नावाने फिर्यादीशी चॅटींग करुन मैत्री करण्यात आली. फ्रान्सीस मर्सीने फिर्यादीस सांगितले की, तीचे वडीलांनी त्यांचा पश्चात तीच्यासाठी मोठ्या प्रमाणावर संपत्ती सोडली आहे. ती संपत्ती तीने फिर्यादीस पार्सल स्वरुपात पाठविल्याचे सांगितले. ती सोडवुन घेण्यासाठी काही चार्जेस भरावे लागतील असेही सांगितले. त्यानंतर दुसऱ्या दिवसापासुन फिर्यादीस वेगवेगळ्या मोबाईल नंबरवरुन कॉल करुन कस्टम अधिकारी, रिझर्व बॅंक अधिकारी, बॅंक अधिकारी अशी खोटी ओळख वापरुन आरोपीने गिफ्ट स्वरुपात पाठविलेली रक्कम सोडवुन घेण्यासाठी एन.ओ.सी. तसेच इतर चार्जेसच्या नावाखाली वेगवेगळ्या अकाऊंटवर एकुण १८,५०,०००/- रुपये घेवुन त्यांची फसवणुक केली म्हणुन वाकड पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ५७२/२०१७ भा.दं.वि.क. ४२०, माहिती तंत्रज्ञान कायदा ६६(सी)(डी) नुसार गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्यात स.पो.नि. सागर पानमंद यांनी तांत्रिक विश्लेषण करुन सदर गुन्ह्यातील आरोपी जॉन ओरीयाकोसे ( नायजेरीयन) यास निष्पन्न केले.

आरोपीस सायबर सेल तपास पथकाने जुने महाविरनगर, टिळकनगर, दिल्ली येथुन अटक केली असुन त्याचे ताब्यातुन गुन्ह्यात वापरण्यात आलेला मोबाईल, १ लॅपटॉप, ३४ सिमकार्ड, वेगवेगळ्या बॅंकाचे २७ डेबीट कार्ड, ३ पेनड्राईव्ह, ४ डोंगल व इतर ७ मोबाईल जप्त केले आहेत. पुढील तपास वाकड पोलीस स्टेशन मार्फतीने करण्यात येत आहे. सदर आरोपीने या सोबत लॉटरी फ्रॉड, जॉब फ्रॉड याव्दारे ३० बॅंक अकाऊंटचा वापर करुन १ कोटी पेक्षा अधिक रक्कमेची फसवणुक केल्याचा संशय असुन अधिक तपास करीत आहोत. सदरचे अकाऊंट गोठविण्यात आले आहेत.

सदरची कामगिरी पोलीस निरीक्षक दिपक लगड, सहा. पोलीस निरीक्षक सागर पानमंद, कर्मचारी अमित अवचरे, योगेश वाव्हळ, राजकुमार जाबा, भास्कर भारती, शिरीष गावडे, नितीन चांदणे, अतुल लोखंडे , नाजुका हुलावळे, संतोष जाधव, दिपक भोसले, अजित कुऱ्हे या तपास पथकाने केली. प्रसाद पोतदार - ज्योती हिवाळे -

याद्वारे आवाहन करण्यात येते की, नोकरीबाबत येणाऱ्या फोनकॉल्स व त्याकरीता पैश्याची मागणी करणाऱ्यांच्या अमिषाला बळी पडु नये. परदेशात नोकरीसाठी भारत सरकार नोंदणीकृत संस्थांचे मार्गदर्शन घ्यावे. सदरबाबत विनानोंदणीकृत संस्था, एजंटस यांचेकडुन दिल्या जाणाऱ्या गलेलठ्ठ पगाराच्या अमिषाला बळी न पडता पासपोर्ट व्हिसा करीता पासपोर्ट कार्यालये यांच्याशी प्रत्यक्ष संपर्क करावा. १४० ने सुरवात न होणाऱ्या क्रमांकावरुन इन्शुरन्स, लोन या करीता फोनव्दारे आपणास संपर्क केला जात असेल तर अश्या एजंट/एजन्सीशी कोणताही आर्थिक व्यवहार करु नये.

मॅट्रीमोनियल साईटस, सोशल नेटवर्कवर प्राप्त फ्रेंड रिक्वेस्ट स्विकारल्यानंतर प्रत्यक्ष व्यकीस भेटुनच पुढील आर्थिक व्यवहार करावेत. अश्या प्रकारच्या संपर्क माध्यमांचा वापर करुन, मैत्री करुन, विश्वास संपादन करुन, लग्नाचे आमिषाने, मोठ्या रक्कमेची, दागिन्यांचे, महागडे मोबाईल इत्यादी. गिफ्ट पाठविले आहे असे सांगुन, तसेच अचानक आर्थिक अडचन आली आहे असे सांगुन पैश्याची मागणी करुन फसवणुक करणाऱ्यांपासुन सावध रहावे.

यापैकी कोणत्याही प्रकाराने आपली फसवणुक झाली असल्यास नजीकच्या पोलीस स्टेशन किंवा सागर पानमंद स.पो.नि.सायबर क्राईम सेल पुणे मो.नं. ९९६०६३१३९३/ फोन नं. ०२०-२६१२३३४६ यांच्याशी संपर्क करावा.

प्रेसनोट दि.१९/१२/२०१७

# कर्ज देण्याच्या बहाण्याने फसवणुक करणाऱ्या आरोपीस सायबर क्राईम सेल पुणे शहर यांनी केली अटक

वाकड, पुणे शहर या भागात रहिवासी असणारे फिर्यादी यांना त्यांचे मोबाईल क्रमांक यावर संपर्क करून इसम नामे सोमनाथ सुकरे उर्फ अजय जगताप याने ५० लाख रूपये लोन देण्याचे खोटे सांगून फिर्यादी यांना सदर कर्जाचे फाईलकरिता लागणारी प्रोसिंसिग फी व इतर फी म्हणून फिर्यादी यांना एसबीआय बँकेचा अकाउंट नं. ००००००२०३५०५७७०८० या बँकेच्या अकाऊंटवर एकुण ३०,०००/- भरण्यास भाग पाडले. परंतु फिर्यादी यांना असे कोणतेही कर्ज मंजूर झाले नसल्याने फिर्यादी यांना त्यांची फसवणुक झाली असल्याचे लक्षात आले. सदरबाबत सायबर क्राईम सेल, गुन्हे शाखा, पुणे शहर या कार्यालयाकडून झालेल्या प्राथमिक चौकशीनंतर वाकड पोलीस स्टेशन गु.र.नं.७१३/२०१७ भादवि कलम ४१९, ४२० सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००८ चे कलम ६६(डी) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यांचा समांतर तपास सायबर क्राईम सेल, गुन्हे शाखेमार्फत करण्यात येत होता. आरोपींनी फिर्यादी यांच्याशी संपर्क करण्यासाठी वापरलेले मोबाईल क्रमांक व बँक अकाऊंटचे तांत्रिक विश्लेषण करुन आरोपीचा शोध घेतला असता आरोपी नामे सोमनाथ बाबुराव सुकरे, वय-४५ वर्षे, रा. फ्लॅट नं. ३६, स.नं. ५५/२, तुळजा भवानी नगर, चंदन मार्बलजवळ, चंदननगर, खराडी याने केला असल्याचे निष्पन्न झाल्याने सदर आरोपीस पुढील कारवाईकामी वाकड पोलीस स्टेशन यांचे ताब्यात देण्यात आला आहे.

सदरची कामगिरी पोउपनि रूपाली पवार, पोउपनि किरण औटे, कर्मचारी मपोशि उमा पालवे, पो.शि. शाहरूख शेख, पो.शि. योगेश वाव्हळ, पो.शि. जाधव, पो.शि माने, पो.शि. जाबा या पथकाने केली आहे.

याव्दारे नागरींकाना अवाहन करण्यात येते की, मोबाईल नंबर ९८५०७७३३३२ याव्दारे कर्ज देतो असे खोटे सांगून एस.बी.आय. बँक अकाऊंट नंबर ००००००२०३५०५७७०८० यावर ५-१० लोकांची ९०,०००/- रुपयांची आर्थिक फसवणुक केली असुन कोणी सदर एस.बी.आय अकाउंटवर पैसे भरले असल्यास त्यांनी तात्काळ वाकड पोलीस स्टेशन अथवा सायबर क्राईम सेल, गुन्हे शाखा, पुणे शहर या कार्यालयाचे ०२०.२६१२३३४६ यावर संपर्क करावा.